# राजेंद्र माने अभियांत्रिकी महाविद्यालयात दि.२१एप्रिल रोजी १२ वी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीर!!!!

आंबव(देवरुख) येथील राजेंद्र माने अभियांत्रिकी महाविद्यालयात दि.२१ एप्रिल रोजी १२ वी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत नि:शुल्क मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.हे शिबीर महाराष्ट्र शासनाच्या राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे होणार आहे.

या शिबिरात एमएचटी-सीईटी २०१८ या प्रथम वर्ष पदवी अभियांत्रिकी, औषधनिर्माण व कृषी अभ्यासक्रमासाठीच्या प्रवेश परीक्षा व प्रक्रिया यावर सविस्तर मार्गदर्शन तज्ञांद्वारे दिले जाणार आहे. या कार्यक्रमाचे प्रसारण 'ऑनलाइन वेबिनार' द्वारे होणार असून ते राजेंद्र माने अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित केले आहे.

कोकण विभागातील विद्यार्थी,पालक व शिक्षकांनी या शिबिराचा अधिकाधिक लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ.महेश भागवत यांनी केले आहे.या कार्यक्रमाची नावनोंदणी अनिवार्य असून अधिक माहितीसाठी महाविद्यालयाच्या कार्यालयात ०२३५४ - २६९४०० या क्रमांकावर संपर्क साधावा.